MHLA140011852024

## निशाणी क्र. ०५ आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने गैरअर्जदार विरुध्द त्यांच्या नावे मंजूर झालेले वारसा प्रमाणपत्राचा कोठेही वापर करु नये, सदर वारसाप्रमाणपत्राआधारे मयताच्या नावे असलेली जमीन हस्तांतरीत करु नये असा मनाई हुकूम मिळणेकामी दाखल केला आहे.

**अर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः**

२. गैरअर्जदाराने न्यायालयाची दिशाभूल करुन खोटे व बनावट कागदपत्रे तयार करुन दिनांक २४.०७.२०२३ रोजी कथीत मयत बसाप्पा गुरु कुंभार याचे वारसा प्रमाणपत्र मिळविण्याकरिता एम.ए.क्र. ५२३/२०२३ दाखल करुन वारसाप्रमाणपत्र प्राप्त केले आहे. सदर अर्जामध्ये गैरअर्जदाराने मयत बसाप्पा गुरु कुंभार हा दिनांक ०२.०९.१९४३ रोजी किल्लारी येथे मयत झाले असून, तो मयताचा चुलत नातू असल्याचे कथन केले आहे. तसेच त्याचे नाव जमिन सर्वे नं. १०३ क्षेत्र १ हे. ९३ आर या जमीनीवर लावणेकरिता वारसाप्रमाणपत्र प्राप्त केले आहे. सदर जमीनीचा मुळ मालक हा लिंगायत समाजाचे आध्यात्मीक गुरु बसाप्पा गुरु कोमार (स्वामी) हे होते. मयत बसाप्पा हे मौजे किल्लारी येथील कोमार स्वामी या मठाचे मठाधिपती होते व ते अविवाहीत होते. मौजे किल्लारी येथील स.नं. १०३ मधील २ हे. ०६ आर जमीनीवर अर्जदार क्र. १ चे वडील गुंडाप्पा उर्फ गुंडू बिराजदार हे कुळ काबीज होते व ते जमीन कसून मठाची सेवा करत होते. सदर गोष्टीच्या नोंदी या जमीनीच्या अधिकार अभिलेख उता–यामध्ये नमुद आहेत.

**३.** मयत हे लिंगायत समाजाचे अध्यिात्मक गुरु होते. गैरअर्जदार हे कुंभार समाजाचा आहे. त्यामुळे बसाप्पा गुरु कोमार (स्वामी) आणि गैरअर्जदार श्रीमंत रामचंद्र कुंभार यांचेमध्ये कोणतेही नातेसंबंध नाहीत. असे असताना गैरअर्जदाराने सदर जमीनीवर वाईट डोळा ठेवून सदर मठाशी संबंधीत जमीन बळकावण्याच्या उद्देशाने कथीत मृत्यूपत्र व कागदपत्रे खाडाखोड करुन तयार केले व सदर वारसाप्रमाणपत्र प्राप्त केले. गैरअर्जदाराने वर नमुद वारसा प्रमाणपत्राच्या आधारे जमीन हस्तांतरीत केल्यास अर्जदाराच्या कायदेशीर हक्कांवर गदा येणार आहे. म्हणून दिवाणी किरकोळ अर्ज ५२३/२०२३ मधील वारसा प्रमाणपत्राचा कोठेही वापर करु नये असा मनाई हुकूम मंजूर व्हावा अशी विनंती अर्जदाराने केली.

**<u>गैरअर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः</u>**

**४.** गैरअर्जदाराने त्याचे लेखी म्हणणे निशाणी क्र. १७ दाखल केले की, सदर अर्ज हा खोटया व काल्पनीक हकीकतीवर केलेला आहे. तसेच सदर अर्ज दिवाणी प्रकिया संहिता, हैद्राबाद कुळ कायदा व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम यांच्या विरुध्द असल्याने ते रद्दबातल करणे न्याय आहे. तसेच इंडियन सक्शेशन ॲक्ट कलम ३८३ प्रमाणे सदर न्यायालयात टेनेबल नाही. गैरअर्जदार हा मयत बसाप्पा गुरु कुंभार यांचा वारस आहे. मयत बसाप्पा हे अविवाहीत असल्याने त्याचे पत्नी अथवा मुले नाहीत. म्हणून गैरअर्जदार हा मयत बसाप्पा गुरु कुंभार यांच्या चुलत भावाचा मुलगा या नात्याने न्यायालयात अर्ज दाखल करुन रितसर चौकशी होवून न्यायालयात दाखल किरकोळ अर्ज क्र. ५२३/२०२३ अन्वये मंजूर झाला आहे. सदर अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ प्रमाणे मंजूर झालेला आहे. सदर प्रमाणपत्र कलम भारतीय वारसा कायदा कलम ३८३ प्रमाणे रद्द करता येणार नाही. त्यामुळे सदर अर्ज बेकायदेशीर असल्याने स्थगीती अर्ज देखील रद्द करणे न्याय आहे. गैरअर्जदार हा देखील लिंगायत (कुंभार) समाजाचा

असून मोलमजूर करुन उदरनिर्वाह करतो, तसेच सदर जमीनीमध्ये मेहनत मशागत करुन त्यावर उत्पन्न घेतो व स्वतःचा उदरनिर्वाह करतो.

**५.** गैरअर्जदाराने पुढे कथन केले की, अर्जदार क्र. १ चे वडील सदर जमीनीवर कुळ आहेत व त्यानंतर ते वारस म्हणून त्या जमीनीवर कुळ असल्याची व त्यावर ते काबीज असल्याचे बाब खोटी आहे. सदर जमीनीवर मालकी रकान्यात बसाप्पा गुरु कुंभार यांचे नाव आहे. तसेच इतर हक्कातील नोंदीमध्ये अर्जदाराचे वडीलांचे नाव देखील आहे. परंतू त्यांचे मृत्यूपश्चात अर्जदार क्र. १ चे नाव दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ यास प्रस्तूत जमीन व वारसा प्रमाणपत्र आव्हानित करण्याचा कोणताही अधिकार नाही. सबब अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

**६.** अर्जदारातर्फे विधिज्ञ श्री.पटेल व गैरअर्जदारतर्फे श्री. फत्तेपूरकर यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षांचे कथन व कागदपत्राचे अवलोकन केले असता प्रस्तूत अर्ज निकाली काढण्याकरीता खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थितीत झाले. मी त्या मुद्यांना खालीलप्रमाणे त्यापुढे निष्कर्ष नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१ | अर्जदार तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यासाठी सकृतदर्शनी अर्ज त्याच्या लाभात असल्याचे सिद्ध करतात काय? | **होकारार्थी.** |
| ०२ | अर्जदार न्यायाचा/सोयीचा समतोल त्याच्या बाजूने असल्याचे सिद्ध करतात काय? | **होकारार्थी.** |
| ०३ | अर्जदार तुर्तातुर्त ताकीद आदेश न मिळाल्यास त्याचे पैशाच्या स्वरुपात कधीही न भरून येणारे नुकसान होईल असे सिद्ध करतात काय? | **होकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| ०४ | अर्जदार तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यास पात्र आहेत काय? | **होकारार्थी.** |
| ०५ | आदेश काय? | **अर्ज अंशतः मंजूर केला.** |

<u>**मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ बाबत**</u> –

७. अर्जदारांतर्फे **विद्वान विधीज्ञ श्री. एस. एच. पटेल** यांनी असा युक्तिवाद केला की, गैरअर्जदाराने न्यायालयाकडून एम.ए.नं. ५२३/२०२३ मध्ये मयत बसाप्पा गुरु कुंभार यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे. सदर वारसा प्रमाणपत्राआधारे गैरअर्जदाराने न्यायालयासमक्ष खोटे व बनावट कागदपत्रे तयार करुन सदर अर्जामध्ये मयताचा चुलत नातू असल्याचे कथन केले आहे. तसेच मयताचे नावे असलेली जमिन सर्वे नं. १०३ क्षेत्र १ हे. ९३ आर या जमीनीवर त्याचे नाव लावणेकरिता वारसाप्रमाणपत्र प्राप्त केले आहे.

८. प्रत्यक्षात सदर जमीनीचे मुळ मालक हे लिंगायत समाजाचे आध्यात्मीक गुरु बसाप्पा गुरु कोमार (स्वामी) हे होते. प्रत्यक्षात बसाप्पा गुरु कोमार (स्वामी) हे लिंगायत समाजाचे मठाधिपती असून गैरअर्जदार हा कुंभार समाजाचा आहे. त्यामुळे बसाप्पा गुरु कोमार (स्वामी) यांचा गैरअर्जदार हा वारस होवू शकत नाही. तसेच गैरअर्जदार हा वारसा प्रमाणपत्राआधारे सदर जमीन हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे वारसा प्रमाणपत्र वापरण्यावर तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

९. अर्जदारातर्फे त्यांचे युक्तीवादाचे समर्थनार्थ निशाणी क्र. ४ लगत एम.ए.क्र. ५२३/२०२३ ची प्रत, खासरापाहणी प्रत, वाद जमीनीचा सन १९६०–६१ ते १९८५ पर्यंतचा जुना ७/१२ उतारा, स.नं. १०३ चा सन

१९९४–९५ ते २०१२ पर्यंतचा ७/१२ उतारा, फेरफार क्र. ४६३६ ची प्रत, वादग्रस्त पुरे नोंदवही, सर्वे नं. १०३ चा ७/१२ उतारा, तलाठी यांना दिलेला अर्ज, मंडळ अधिकारी यांचा अहवाल, तक्रारी फेर सुनावणीची नोटीस, मयताचे मृत्यूप्रमाणपत्र इ. दाखल केले आहेत.

**१०**. गैरअर्जदारांतर्फे **विद्वान विधीज्ञ श्री. फत्तेपुरकर** यांनी असा युक्तिवाद केला की, सदर अर्ज दिवाणी प्रकिया संहिता, हैद्राबाद कुळ कायदा व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम यांच्या विरुध्द असल्याने तरे रद्दबातल करणे न्याय आहे. तसेच इंडियन सक्शेशन ॲक्ट कलम ३८३ प्रमाणे सदर न्यायालयात टेनेबल नाही. गैरअर्जदार हा मयत बसाप्पा गुरु कुंभार यांचा वारस आहे. मयत बसाप्पा हे अविवाहीत असल्याने गैरअर्जदार हा मयत बसाप्पा गुरु कुंभार यांच्या चुलत भावाचा मुलगा या नात्याने वारस आहे. सदर अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ प्रमाणे मंजूर झालेला आहे. सदर प्रमाणपत्र कलम भारतीय वारसा कायदा कलम ३८३ प्रमाणे रद्द करता येणार नाही. तसेच अर्जदारांना सदर अर्ज दाखल करण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**११**. प्रथमदर्शनी तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जाचा विचार करता पुरावापुर्व परिस्थीतीमध्ये अभिलेखावर दाखल कागदपत्रे पाहणे आवश्यक असते. अर्जदाराने सदर अर्ज हा गैरअर्जदाराने न्यायालयामधुन प्राप्त केलेल्या वारसा प्रमाणपत्राचा वापर करणेवर तुर्तातुर्त मनाई हुकूम देणेसाठी दाखल केला आहे. अर्जदारांच्या कथनानुसार बसाप्पा गुरु कोमार (स्वामी) हे लिंगायत समाजाचे मठाधिपती होते व गैरअर्जदार हा कुंभार समाजाचे आहेत. त्यामुळे ते बसाप्पा गुरु कोमार यांचे वारस होवू शकत नाही. याउलट गैरअर्जदाराने कथन केले आहे की, बसाप्पा गुरु कुंभार यांचे चुलत भावाचा मुलगा या नात्याने ते वारस आहेत. अभिलेखावर दाखल किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ५२३/२०२३ व त्यावरील

आदेशाचे अवलोकन केले असता, गैरअर्जदार हा मयत बसाप्पा गुरु कुंभार यांचा वारस या नात्याने प्रमाणपत्र दिले गेलेले दिसून येते.

**१२.** अर्जदाराचे कथनानुसार लिंगायत समाजाचे गुरु बसाप्पा गुरु कोमार (स्वामी) हे आहेत. यावरुन गैरअर्जदार हा बसाप्पा गुरु कुंभार यांच्या चुलत भावाचा मुलगा असून त्याला न्यायालयामार्फत वारसा प्रमाणपत्र मिळाले असले तरी अर्जदाराचे कथनानुसार लिंगायत समाजाचे गुरु बसाप्पा गुरु कोमार (स्वामी) यांचा वारस म्हणून गैरअर्जदाराने वारस प्रमाणपत्र घेतलेले नाही. तसेच न्यायालयानेही ते दिलेले नाही. अर्जदाराने दाखल केलेल्या बसाप्पा गुरु कुंभार याचे मृत्यूप्रमाणपत्राची प्रत पाहता असे दिसून येते की, गैरअर्जदाराने न्यायालयातून मृत्यूचे नोंदीकरिता फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ४३/२०२३ दाखल केला होता व त्यावर न्यायालयाने दिनांक ०८.०६.२०२३ रोजी आदेश करुन बसाप्पा गुरु कुंभार यांचे मृत्यूची नोंद दिनांक ०२.०९.१९४३ असलेबाबत केली होती. यावरुन ग्रामपंचायत किल्लारी यांनी मृत्यू प्रमाणपत्र दिनांक २७.०६.२०२३ रोजी गैरअर्जदारास दिले असलेचे दिसून येते.

**१३.** यावरुन गैरअर्जदाराने सन २०२३ मध्ये मयत बसाप्पा गुरु कुंभार यांचे मृत्यूप्रमाणपत्र हस्तगत करुन वारस प्रमाणपत्र मिळणेकामी न्यायालयात अर्ज केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. परंतू, गैरअर्जदार जरी मयत बसाप्पा गुरु कुंभार यांचे वारस असतील, तरी गट क्र. १०३ क्षेत्र १ हे. ९३ आर याचे ते वारस आहे हे अभिलेखावर पुराव्यानिशी सिध्द होणे बाकी आहे. तसेच अर्जदाराने दाखल केलेले जमिन सर्वे नं. १०३ क्षेत्र १ हे. ९३ आर चे जुने ७/१२ उतारे निशाणी क्र. ४/३ व ४/४ चे अवलोकन केले असता त्याच्या मालक सदरी बसाप्पा गुरु 'कोमार' असे नाव नमुद असून इतर अधिकारात कुळ म्हणून अर्जदाराचे नाव आजरोजीच्या ७/१२ मध्येही दिसून येते. यावरुन बसाप्पा गुरु यांचे नावामध्ये कोमार आहे किंवा कुंभार आहे, या नावाबाबत खाडाखोड केल्याचे दिसून येते.

**१४.** सदर अर्जात बसाप्पा गुरु कोमार (स्वामी) व बसाप्पा गुरु कुंभार हे एकच व्यक्ती आहेत अथवा दोन वेगळया व्यक्ती आहेत हे अभिलेखावर पुराव्यानिशी स्पष्ट होणे बाकी आहे. अर्जदाराने अर्जात लिंगायत समाजाचे गुरु मयत बसाप्पा गुरु कोमार (स्वामी) यांची गट क्र. १०३ वरती मालकी नाकारली नसून ते कुळ म्हणून समाजाचे वतीने जमीन कसतात व मठाची सेवा करतात. सदर जमीन संपुर्ण लिंगायत समाजाची असून, ती अर्जदाराकडून मठाची सेवा करत असेल तर गैरअर्जदार यांनी सदर जमीनीवर बसाप्पा गुरु कुंभार यांचे वारस म्हणून नोंद करत असताना केवळ अर्जदारच नाही तर संपुर्ण लिंगायत समाज मौजे किल्लारी यांनी तलाठी यांचेकडे हरकत अर्ज देवून हरकत दर्शविली आहे. यावरुन अर्जदाराने प्रथमदर्शनी केस सिध्द केली असून, अर्जदाराचे कथनानुसार बनावट कागदपत्राआधारे गैरअर्जदार मठाची जमीनीवर वारस म्हणून नाव नोंदवून फेरफार नोंद करीत असेल, तसेच सदर जमीनीचे ०.१३ आर क्षेत्र शासनाने कॅनॉलसाठी संपादित केली असून त्याचा मोबदला देण्याचे ठरविले असताना सदरचा अर्ज नामंजूर केल्यास अर्जदाराचे अपरिमित असे नुकसान होईल. केवळ अर्जदाराचेच नाही तर मौजे किल्लारी येथील संपुर्ण लिंगायत समाजाचे पर्यायाने नुकसान होईल. सबब न्यायाचा समतोल अर्जदाराचे बाजूने असून मी मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर होकारार्थी देते व मुद्दा क्र. ५ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो ;

## आ दे श

१. अर्ज निशाणी क्र. ०५ अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदाराने दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५२३/२०२३ मध्ये दिनांक २५.०९.२०२३ रोजीच्या आदेशानुसार प्राप्त

केलेल्या वारसा प्रमाणपत्राचा कोणत्याही शासकिय अगर निमशासकीय कामाकरिता अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत वापर करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम देण्यात येतो.

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2024.08.29 18:05:14 +0530

औसा. (एस. डी. साबळे)
दिनांकः– २९/०८/२०२४ २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, औसा.